# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०५/०३/२०२५ (बुधवार)**

---

## महाराष्ट्र शासनाच्या १०० दिवसाच्या उपक्रमाअंतर्गत रामटेक उपविभगात, रामटेक येथे आयोजित करण्यात आली तीन नवीन कायद्याबाबत जनजागृती कार्यशाळा

मा. श्री हर्ष ए. पोद्‌दार ,पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली नागपुर ग्रामीण पोलीस विभागातर्फे महाराष्ट्र शासनाच्या १०० दिवसाच्या उपक्रमाअंतर्गत गंगाभवन सभागृह, आंबेडकर चौक, रामटेक येथे संपूर्ण देशामध्ये लागू झालेल्या तीन नवीन कायद्याबाबत जनजागृती कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. सदर मार्गदर्शन कार्यशाळेत सामान्य जनते मध्ये १ जुलै २०२४ पासुन संपूर्ण देशामध्ये लागु झालेल्या १. **भारतीय न्याय संहिता** , २. **भारतीय नागरिक सुरक्षा संहीता** ,३. **भारतीय साक्ष अधिनियम** या तीन नविन कायदयाबाबत जनजागृती करणे कामी कायदेविषयीक मार्गदर्शन करण्यात आले. सदर कार्यशाळेत डॉ. अभिलाषा खुर , असिस्टंट प्रोफेसर सिम्बॉयसिस लॉ कॉलेज, वाठोडा ,नागपूर आणि ॲड. मंजुषा गिरडकर, विधी अधिकारी, रामटेक यांनी तीन नविन कायदयांबाबत सविस्तर माहीती देवुन मार्गदर्शन केले तसेच श्री रमेश बरकते, उपविभागीय पोलीस अधिकारी, रामटेक विभाग, रामटेक यांनी सुद्धा तीन नवीन कायदे व तपासाबाबत मार्गदर्शन केले. सदर कार्यशाळेत रामटेक उपविभागातील प्रभारी अधिकारी श्री आसाराम शेटे,पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन रामटेक, श्री राजेश थोरात , पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन पारशिवणी, श्री स्नेहल राउत ,सहा.पोलीस निरीक्षक ,पोलीस स्टेशन अरोली, श्री नारायण तुरकुंडे, सहा.पोलीस निरीक्षक ,पोलीस स्टेशन देवलापार, श्रीमती धनश्री कुटेमाटे, सहा.पोलीस निरीक्षक, दामीनी पथक ,उपविभाग रामटेक तसेच रामटेक उपविभागतील पोलीस अंमलदार सर्व पोलीस पाटील , स्थानिक लोकप्रतिनिधी, सरपंच, उपसरपंच, जेष्ठ नागरिक, शांतता

समिती सदस्य, महीला दक्षता समिती सदस्य अशी एकूण १८० ते १९० जणांची कार्यशाळेला उपस्थित होती.









जिल्हान्तरीय नवीन कायदेविषयक
जनजागृती कार्यशाळा
मा.श्री.रमेश धुमाळ (म.पो.से.)
मा.श्री.रमेश बरकते




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर